शुक्रवार, दि. २५ जुलै २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ३५० वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
MEDICAL मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282




जालना - संभाजी नगर रोड येथील चौफुली येथे प्रहार संघटनेच्या वतीने चक्का जाम आंदोलन करण्यात आल. (छाया - जावेद तंबोली)

## महामार्गावर पत्त्यांचा खेळ

### शेतकऱ्यांचे अनोखे चक्काजाम आंदोलन

**जालना । प्रतिनिधी -** राज्य सरकारकडून सरसकट कर्जमाफीच्या आश्वासनाची पूर्तता न झाल्याने संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी आज जालन्यात जालना-छत्रपती संभाजीनगर महामार्गावर चक्काजाम आंदोलन केले. विशेष म्हणजे, या आंदोलनात शेतकऱ्यांनी महामार्गावर बसून पत्ते खेळत सरकारचा निषेध नोंदवला.

गुरुवार, दिनांक २४ जुलै रोजी सकाळी ११ वाजता सुरू झालेल्या या आंदोलनात शेतकऱ्यांनी महामार्गाच्या दोन्ही बाजूंनी वाहतूक ठप्प केली. वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. पावसाळी अधिवेशन पार पडल्यानंतरही सरकारने कर्जमाफीबाबत कोणतीही ठोस घोषणा केली नसल्याने, शब्दांवर नाही विश्वास, कृती हवी असा संदेश देत शेतकऱ्यांनी रस्त्यावर आंदोलन छेडले.

महायुतीने विधानसभा निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफीचं आश्वासन दिलं होतं. मात्र, सत्तेवर आल्यानंतर सहा महिने उलटूनही त्या आश्वासनाची पूर्तता झाली नसल्याचा आरोप आंदोलक शेतकऱ्यांनी केला. कर्जमाफी नसेल **पान २ वर**

## महायुतीचं आश्वासन हवेत... शेतकरी रस्त्यावर!

### जामवाडी येथे शेतकऱ्यांचा रास्ता रोको आंदोलन; कर्जमाफीच्या मागणीसाठी महामार्ग ठप्प

**जालना । प्रतिनिधी -** महायुती सरकारकडून निवडणुकीपूर्वी दिलेल्या कर्जमाफीच्या आश्वासनाची अद्यापही पूर्तता न झाल्याने आक्रमक झालेल्या शेतकऱ्यांनी आज जालन्याच्या जाम वाडी येथे रास्ता रोको आंदोलन केले. जालना-देऊळगाव राजा महामार्गावर दोन्ही बाजूंनी शेतकऱ्यांनी रस्ता अडवत तीव्र घोषणाबाजी केली.

शेतकऱ्यांनी सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करत तातडीने सरसकट कर्जमाफी जाहीर करण्याची मागणी केली. महायुती सरकारने निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफीचे आश्वासन दिले होते. मात्र, सत्तेतील सहा महिने उलटून पावसाळी अधिवेशनही संपले तरी सरकारने शेतकऱ्यांची फसवणूकच **पान २ वर**



## शाळेची छप्पर उडाली पण शिक्षकांनी जबाबदारी उचलली!

### सातेफळ जिप शाळेचे पत्रे शिक्षकांनी स्वखर्च व श्रमदानाने केले दुरुस्त

**विशाल देशमुख**

**जाफराबाद -** सातेफळ येथील जिल्हा परिषद शाळेची छप्पर मे महिन्यात आलेल्या वादळी वाऱ्यामुळे उडाली होती. या आपत्तीम ध्ये शाळेच्या छतासह विविध शालेय साहित्याचे मोठे नुकसान झाले होते. शाळा सुरू होण्यास अवघे काही दिवस असताना विद्यार्थ्यांना बसवावे कसे, हा मोठा प्रश्न निर्माण झाला होता.

परंतु शाळेचे मुख्याध्यापक व त्यांच्या सहकारी शिक्षकांनी कोणतीही तक्रार न करता, स्वखर्चातून व स्वतः श्रमदान करून शाळेची दुरुस्ती करून घेतली. शाळा सुटल्यानंतर वेळ काढून त्यांनी बांधकाम व पत्रे बसवण्याचे काम हाती घेतले. त्यांच्या या कार्याचे तालुकाभर कौतुक होत आहे.

शासकीय शिक्षकांबाबत अनेकदा नकारात्मक चर्चा होत असताना, सातेफळ शाळेतील शिक्षकांनी प्रत्यक्ष कृतीतून समाजापुढे सकारात्मक उदाहरण ठेवले आहे. त्यांच्या उपक्रम शीलतेमुळे गावकऱ्यांमध्ये



समाधानाची भावना असून शिक्षकांचे मनःपूर्वक अभिनंदन केले जात आहे.

सातेफळ शाळेमध्ये पहिली ते पाचवी पर्यंत वर्ग आहेत. गतवर्षीच्या तुलनेत यंदा विद्यार्थ्यांची संख्या वाढली असून विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाची आवड निर्माण झाल्याचे दिसून येते.

शिक्षकांच्या सकारात्मक कार्याचे सन्मानपूर्वक कौतुक केले जात असून इतर शाळांसाठी प्रेरणादायी उदाहरण बनले आहे. सरकारी शाळांविषयीचा दृष्टिकोन बदलण्यास यामुळे हातभार लागणार आहे.

**केंद्रप्रमुख गजानन माटे म्हणाले -**

डोणगाव केंद्रातील सर्वच जिल्हा परिषद शाळांतील शिक्षक उपक्रमशील आहेत. अनेक शाळांमध्ये पटसंख्या वाढली आहे. नवोदयसारख्या स्पर्धा परीक्षांमध्येही विद्यार्थ्यांची निवड होत आहे, ही आनंदाची बाब आहे.

युवा आदर्श

### उपवास ...

गत हारी अमावस्या
दीप पुजा करे खास
करा श्रावण स्वागत
सुरु होईलं चातुर्मास
किती खाता बाबांनो
घासा मागून ते घास
कधीतरी गा करावा
काहीदिवस उपवास
भिन्न भिन्न असे नावे
रोजा लंघन उपवास
सर्व धर्म पंथात असे
महत्व अगदी खास
विश्राम पचनसंस्थेला
आराम मिळे पोटास
धर्म शास्त्राची सांगड
शुध्द होणार रे श्वास
तोलून पहावा तराजू
नाही हा अंध विश्वास
बचत होईलं अन्नाची
घास भुकेल्या जीवास
चमचमीत खाणा-या
रोखावे जरा जिव्हास
स्वस्थ तंदुरुस्त आयु
मिळे आनंद सहवास

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## शिबिरात वकिल व न्यायालयीन कर्मचाऱ्यांची मोफत थायरॉईड चाचणी

### सौ. जमुनाबाई शिवरतनजी बगडिया चॅरिटेबल ट्रस्ट व रोटरी रेनबो क्लबचा उपक्रम

**जालना । प्रतिनिधी -** सौ. जमुनाबाई शिवरतनजी बगडिया चॅरिटेबल ट्रस्टच्यावतीने व रोटरी क्लब ऑफ जालना रेनबोच्या सहकार्याने जिल्हा वकील संघाच्या कार्यालयात आयोजित शिबिरात १०० पेक्षा अधिक वकिल आणि न्यायालयीन कर्मचाऱ्यांची मोफत थायरॉईड चाचणी करण्यात आली.

बुधवार दि. २३ जुलै रोजी पार पडलेल्या या शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी रोटरी क्लब ऑफ जालना रेनबोचे सचिव पंकज लड्डा, जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष ॲड. अनिरुद्ध घुले पाटील, उपाध्यक्ष ॲड. मारोती आटोळे, सचिव ॲड अभिषेक सतकर, सहसचिव ॲड. विनोद चव्हाण, ॲड. महेश धन्नावत, ॲड. ईश्वर बिल्होरे, ॲड. लक्ष्मण उढान, ॲड. सोपान शेजुळ, ॲड. अक्षय कुवरपुरिया, ॲड. अरविंद मुरमे आदींची उपस्थित होते. यावेळी १०० वकिल आणि न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या थायरॉईड चाचण्या करण्यात आल्या.

सौ. जमुनाबाई शिवरतनजी बगडिया चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष पन्नालाल बगडीया यांच्या संकल्पनेतून प्रकल्प प्रमुख डॉ. राजेश सेठिया यांच्या **पान २ वर**



## निकृष्ट दर्जाचे केक विकणाऱ्या शहा ट्रेडर्स वर कारवाई करा

### राम अवघड यांची अन्न व औषध प्रशासनाकडे मागणी

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील टांगा स्टेन्ड, नवीन जालना भागातील शहा ट्रेडर्स येथून एक ५०० ग्रम केक विकत घेतला असता, तो केक घरी आणून पाहिल्यावर त्या मध्ये प्लास्टिक बारदाना पिशवीचे तुकडे मोठ्या प्रम ाणात आढळून आले आहेत. त्या बाबत सादर दुकानदार आणि पुरवठादार छत्रपती संभाजीनगर येथील पुरवठादार (नीरज जैन) यांच्याशी संपर्क साधला असता ते उडवा-उडवीचे उत्तरे देत आहेत.

या भेसळयुक्त आणि निकृष्ट दर्ज्याच्या केकमुळे ज्यांनी तो केक खाल्ला त्यांच्या आरोग्यास भविष्यत धोका निर्माण झाल्यास त्याची पूर्ण जबाबदारी सदर शहा ट्रेडर्स आणि त्याचा छत्रपती संभाजीनगर येथील पुरवठादार यांची राहील.

तरी, या शहा ट्रेडर्स आणि त्याच्या छत्रपती संभाजीनगर येथील पुरवठादार (नीरज जैन) यांची सखोल चौकशी करून त्यांच्यावर कडक कायदेशीर कारवाई करावी. इतरही आणखी कोणकोणते निकृष्ट खाद्य पदार्थ येथून विकले जातात, सदर पुरवठादार आणखी किती दुकानांवर मालाचा पुरवठा करतो त्या सर्वाची चौकशी करून भविष्यात एखादी मोठी दुर्घटना **पान २ वर**

## महानगरपालिकेवर भगवा फडकण्यासाठी तयारीला लागा

### आढावा बैठकीत; आमदार अर्जुनराव खोतकर यांचे पदाधिकाऱ्यांना आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** आगामी होऊ घातलेल्या जालना शहर महापालिका निवडणूक संदर्भात गुरुवार (दिनांक २४) रोजी जालना जालना शिवसेना शहर शाखा व प्रमुख पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक भाग्यनगर संपर्क कार्यालयात आमदार अर्जुनराव खोतकर यांनी घेतली.बैठकीमध्ये प्रभाग निहाय सर्व प्रमुख पदाधिकाऱ्यांशी चर्चा करून त्यांच्या प्रभागातील शिवसेनेचा आढावा घेण्यात आला त्यांच्या प्रभागात शिवसेनेला म हापालिका निवडणूक संदर्भात कसे पोषक वातावरण आहे याची परिस्थिती जाणून घेतली,व कार्यकर्त्यांनी आपण शहरांसाठी विविध विकास कामासाठी मोठ्या प्रमाणावर शासनाकडुन निधी उपलब्ध करून घेतला यामधून अनेक विकास विकासाची कामे पूर्ण झाली असून अनेक काही कामे प्रगती पथावर आहेत. काही कामे सुरू असून काही कामे निवीदा स्तरावर आहेत. शहरांम धील नवीन विकास कामाचे प्रस्ताव देखील शासन स्तरावर मंजुरीसाठी सादर आहेत.या कामासंदर्भात सर्वसामान्य नागरिकांमध्ये प्रसिद्ध करावी.मतदारामध्ये शिवसेनेबद्दलचा विश्वास निर्माण करून घ्यावा. केलेले विकास कामे सर्व सामान्य जनतेपर्यंत पोहोचण्याचे काम प्रमुख पदाधिकारी व शिवसैनिकांनी करावे. हिंदूहृदयसम्राट सन्माननीय बाळासाहेब ठाकरे यांच्या ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण या विचारसरणीवर प्रत्येक शिवसैनिकाने तंतोतंत पालन करून आपल्या भागातील जनतेच्या सुख दुःखात नेहमी सहभागी राहावे. आपल्या भागात शिवसेना ,युवासेना ,महिला आघाडी, च्या शाखा स्थापन कराव्यात घर तेथे शिवसैनिक ही संकल्पना आपल्या भागात राबवावी.

आगामी महानगरपालिका निवडणूकीत पहिला महापौर शिवसेनेचा कसा होईल यासाठी आतापासून जोमाने कामाला लागावे असे आवाहन उपस्थित सर्व प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना आमदार खोतकर यांनी व्यक्त केले.

यावेळी जिल्हा संपर्कप्रमुख पंडितराव भुतेकर, सहसंपर्क एडवोकेट सुनील किनगावकर, शिवसेना शहरप्रमुख विष्णूभाऊ पाचफुले, गणेशसेठ राऊत, उपजिल्हाप्रमुख संतोष मोहिते, उपजिल्हाप्रमुख गणेश सुपारकर, योगेश रत्नपारखे, दीपक वैद्य, अल्पसंख्यांक शहर प्रमुख जफर खान, दिनकर घेंवंदे, मेघराज चौधरी,राहुल हिवराळे, महेश दुसाने, सविता केवंडे, विजया चौधरी, यांच्यासह शहरातील सर्व आजी-माजी नगरसेवक, विभाग प्रमुख,उप विभाग प्रमुख, महिला आघाडी,दलीत आघाडीचे प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# संपादकीय

पान

## खुमासदार लेखणी थंडावली

महाराष्ट्रातील प्रसिद्ध पत्रकार, लेखक, स्तंभ लेखक शिरीष कणेकर यांचा आज स्मृतिदिन. २५ जुलै २०२३ रोजी वयाच्या ८० व्या वर्षी त्यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने सर्वांना धक्का बसला होता कारण ते असे अचानक निघून जातील असे कोणालाही वाटले नव्हते कारण त्यांच्या मृत्यूच्या आदल्या दिवशी त्यांनी लिहिलेले लेख वर्तमानपत्रात छापून आले होते. माझ्यासाठी तर तो खूप मोठा धक्का होता कारण ते माझे सर्वात आवडते लेखक होते. त्यांची जवळपास सर्वच पुस्तके मी वाचून काढली आहेत. वर्तमानपत्रातील त्यांचे लेख वाचूनच मी स्तंभलेखनाकडे वळलो. त्यांच्या लेखाचा विषय माझा सर्वात आवडीचा विषय. माझाच कशाला आज जे चाळीशी - पन्नाशीत आहे त्या सर्वांचा आवडीचा विषय ते आपल्या लेखणीतून खुमासदारपणे हाताळत आणि तो विषय म्हणजे चित्रपट आणि क्रिकेट. वर्तमान पत्रात त्यांचे चित्रपट आणि क्रिकेटवर लेख छापून आले की ते झटक्यात वाचून संपवणे आणि त्यावर तासनतास चर्चा करणे हा आमच्या मित्र मंडळींचा आवडता छंद. त्यांच्यामुळेच आम्हाला जुन्या काळातील कुंदनलाल सैगल, दिलीप कुमार, राज कुमार, अशोक कुमार, राज कपूर, शम्मी कपूर, देवानंद या अभिनेत्यांची ओळख झाली. तसेच पन्नास ते ऐंशी च्या दशकातील क्रिकेटपटूंची ओळख झाली. केवळ अभिनेते, अभिनेत्री आणि क्रिकेटरच नव्हे तर हिंदी सिनेसंगीत हा देखील त्यांच्या लेखनाचा आवडीचा विषय होता. अतिशय अभ्यासपूर्ण, खुसखुशीत आणि विनोदीशैली हे त्यांच्या लेखणीचे वैशिष्ट्य. अतिशय खुसखुशीत विनोदी शैलीत ते लिहित असल्याने तरुण वर्ग त्यांचा मोठा वाचक बनला. तरुण मुलांचे ते आवडते लेखक होते. तरुण मुले कट्ट्यावर बसून ज्या प्रमाणे गप्पा मारत अगदी तसेच त्यांचे लेखन होते त्यामुळेच त्यांचा सर्वाधिक वाचकवर्ग हा तरुण होता. वर्तमानपत्रात लेख लिहून स्तंभलेखक म्हणून नावारूपास आलेल्या शिरीष कणेकर यांनी पुढे अनेक पुस्तके लिहिली. यादो की बारात, शिरीषासन, सिनेमाबाजी, मुद्दे आणि गुद्दे, चहाटळकी, सुरपारंब्या, सिनेमगिरी, लागाव बत्ती, कणेकरी, चिमटे आणि गालगुच्चे, आसपास, मेतकूट, चित्ररूप, कल्चर - वल्हचर असे त्यांचे विविध वर्तमानपत्रातील स्तंभ लेखन गाजले. गाये चला जा, यादो की बारात, एक्केचाळीस, गोळी मार भेजे में, गोतावळा, कुरापत, मखलाशी, फटकेबाजी, पुन्हा यादों की बारात, टिवल्या - बावल्या, चंची, चापट पोळी, डॉलरच्या देशा, एकला, रहस्यवल्ली, सुरपारंब्या, क्रिकेटवेध, नट - बोलट, बोलपट, सिनेमा डॉट कॉम ही त्यांची पुस्तके खूप लोकप्रिय झाली. शिरीष कणेकर यांनी लेखनासोबत क्रिकेट व चित्रपटावर स्टॅण्ड अप शो देखील केले. माझी फिल्लमबाजी, फटकेबाजी, ....आणि पुन्हा कणेकर हे त्यांचे स्टँड अप शो खूप लोकप्रिय झाले. त्यांना अनेक पुरस्कार देखील मिळाले पण वाचकांच्या मनात त्यांचे जे स्थान होते ते कोणत्याही पुरस्कारापेक्षा श्रेष्ठ होते. कणेकर गेले आणि खुमासदार लेखणी थंडावली असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. आपल्या खुमासदार लेखनाने तरुण वाचकांच्या मनात आगळे स्थान निर्माण करणारा हा अवलिया लेखक आज आपल्यात नाही हे मन मानायला तयार नाही. शिरीष कणेकरांची फिल्लमबाजी, फटकेबाजी पुन्हा अनुभवता येणार नाही याची खंत वाटते. असो नियतीने जे मांडून ठेवले आहे ते स्वीकारावेच लागेल. शिरीष कणेकर यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी; गरीब रुग्णांसाठी वरदान

राज्यातील गरीब व गरजू नागरिकांना महागड्या व जीवनावश्यक उपचारासाठी आर्थिक सहाय्य देणे जसे की कर्करोग, हृदयरोग, किडनी प्रत्यारोपण इत्यादीसाठी वैद्यकिय मदत पुरविणे. राज्यातील धर्मादाय रुग्णालयांना आवश्यक वैद्यकिय उपकरणे, औषधे किंवा सुविधा निर्माण कर ण्यासाठी सहाय्य कर णे. वैद्यकीय मदतीसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी आणि धर्मादाय रुग्णालयांमधील सेवा एकत्रित करुन नागरिकांना सुलभ सेवा देण्याचा उद्देश आहे. गरीब, वंचित, आदिवासी व ग्रामीण भागातील लोकांनाही उच्च दर्जाची आरोग्य सेवा मिळावी यासाठी प्रयत्न करुन आरोग्य सेवा उपलब्धतेत समता आणणे आहे. धर्मादाय रुग्णालयांनी त्याची कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलीटी अथवा ट्रस्टच्या माध्यमातून अधिकाधिक गरीब रुग्णांवर मोफत किंवा सवलतीने उपचार करावेत यासाठी त्यांच्याशी समन्वय ठेवणे. त्वरीत निर्णयप्रक्रिया व पारदर्शकतेअंर्तगत रुग्णांच्या अर्जावर त्वरीत निर्णय घेणे व निधी वितरण प्रक्रियेत पारदर्शकता राखणे अशी मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाची वैशिष्टे आहेत.

महाराष्ट्र राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना दुर्धर आजारावर उपचार करण्यासाठी तातडीने मुख्यमंत्री वैद्यकिय सहाय्यता निधी या निधीतून सहाय्यता देण्यात येते. आरोग्यासाठी शासकीय योजनांचा सुयोग्य वापर होण्यासाठी मुख्यमंत्री वैद्यकिय सहाय्यता निधी महत्वाचा घटक आहे. राज्यातील शेकडो गरीब व गरजू रुग्णांना मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्यावतीने आर्थिकदृष्ट्या दुर्बल १४ हजार ६५१ रुग्णांना गेल्या सहा महिन्यात १२८,६,६८000/- मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून मंजूर करण्यात आलेली आहे. मुख्यमंत्री वैद्यकिय सहाय्यता निधीचा लाभ मिळण्यासाठी जालना जिल्ह्यासाठी समन्वयक म्हणून वैद्यकिय अधिकारी डॉ.सोपान विक्रम चव्हाण




(९९७०३३६१११) यांची नेमणूक केलेली आहे.

महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत मोफत उपचाराच्या लाभासाठी जिल्ह्याच्या समन्वयकास फोन करुन रुग्णाला नामतालिकेवरील रुग्णालयात डमिट करावे लागते. जिल्ह्यातील चॅरिटी हॉस्पिटलमधील उपलब्ध बेडबाबत माहिती चॅरिटी इन्सपेक्टर यांच्या कार्यालयातून घेवून त्यानूसार चॅरिटी रुग्णास चॅरिटी बेड उपलब्ध असलेल्या दवाखान्यात डमिट करावे लागते. तर राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमातंर्गत 0 ते १८ वर्षे वयापर्यंतच्या रुग्णांना मोफत उपचार केले जातात. मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये रुग्णालय अंगीकृत करण्याची प्रक्रिया आणि मुख्यमंत्री वैद्यकिय अर्थसहाय्य वितरीत करणे या दोन्ही प्रक्रिया संपुर्णतः निःशुल्क आहेत. उपचार पुर्ण झालेल्या रुग्णांना खर्चाची प्रतिपुर्ती म्हणून अर्थसहाय्य देय नाही.

**मुख्यमंत्री सहायता निधीतून उपचार मिळणारे आजार :-**

मुख्यमंत्री सहायता निधीअंतर्गत कॉकलियर इम्प्लांट (वय २ ते ६ वर्षे), हृदय प्रत्यारोपण, यकृत प्रत्यारोपण, किडनी प्रत्यारोपण, फुप्फुस प्रत्यारोपण, बोन मॅरो प्रत्यारोपण, हाताचे प्रत्यारोपण, हिप रिप्लेसमेंट, कर्करोग शस्त्रक्रिया, रस्ते अपघात, लहान बालकांची शस्त्रक्रिया, मेंदुचे आजार, हृदयरोग, डायलिसीस, कर्करोग केमोथेरेपी/रेडिएशन , अस्थिबंधन, नवजात शिशुंचे आजार, गुडघ्याचे प्रत्यारोपण, बर्न रुग्ण, विद्युत अपघात रुग्ण या अशा एकूण २० गंभीर आजारासाठी इतर तीन योजनांचा लाभ मिळू न शकणाऱ्या आणि राज्यातील या योजनेत नोंदणीकृत रुग्णालयात उपचार घेणाऱ्या पात्र रुग्णांसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून वैद्यकिय समितीमार्फत तपासून अर्थसहाय्य दिले जाते. अधिक माहितीसाठी दुरध्वनी क्र.०२२ २२०२६९४८ तसेच व्हॉटस अप क्र. ९०४९७८९५६७ यावर संपर्क साधावा.

**मुख्यमंत्री सहायता निधीसाठी कागदपत्रे :-**

मुख्यमंत्री सहायता निधीअंतर्गत लाभ मिळण्यासाठी विहीत नमुन्यातील अर्ज, रुग्ण दाखल असल्यास त्याचा जीओ टॅग फोटो सोबत जोडणे बंधनकारक आहे. निदान व उपचारासाठी लागणाऱ्या वैद्यकिय खर्चाचे प्रमाणपत्र खाजगी रुगणालय असल्यास जिल्हा शल्य चिकित्सक यांच्याकडून प्रमाणित करुन घेणे आवश्यक आहे. तहसीलदार यांचा उत्पन्नाचा दाखला चालू वर्षाचा असणे आवश्यक आहे. रुग्णांचे आधारकार्ड, लहान बाळासाठी आईचे आधारकार्ड आवश्यक आहे. रुग्णांची शिधापत्रिकेची प्रत संबंधीत आजाराचे रिपोर्ट तर अपघातग्रस्त रुग्णांसाठी एफआयआर रिपोर्ट आवश्यक आहे. प्रत्यारोपण रुग्णांसाठी झेडटीसीसी, शासकीय समितीची मान्यता आवश्यक आहे. या सर्व प्रक्रिया पार पाडतेवळी संबंधित रुग्णालयाची नोंद मुख्यमंत्री सहाय्यता निधी कार्यालयाच्या संगणक प्रणालीवर असल्याची खात्री करावी. तसेच अर्थसहाय्याची मागणी ई-मेलद्वारे केल्यास अर्जासह सर्व कागदपत्रे पिडीएफ स्वरुपात वाचनीय स्थितीत त्याच्या मुळ प्रती मुख्यमंत्री सहाय्यता निधीकडे टपालाद्वारे तात्काळ पाठविण्यात यावी.

राज्याबाहेरील रुग्णालयावर महाराष्ट्र शासनाचे यंत्रणांचे नियंत्रण नसते तसेच त्यांच्याकडून उपयोगिता प्रमाणपत्र घेणे शक्य होत नसल्यामुळे राज्याबाहेरील रुग्णालयांना अर्थसहाय्य प्रदान करण्यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे. मुख्यमंत्री वैद्यकिय सहायता निधी कक्ष अंगीकृत असलेल्या रुग्णालयांची यादी cmrf.maharashtra.gov.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**- जिल्हा माहिती कार्यालय, जालना**

## पान १ वरुन

पान १ वरुन

### महामार्गावर ...

तर आम्ही शांत बसणार नाही, असा इशारा देत त्यांनी महामार्गावर पत्ते खेळत आंदोलनाची अनोखी पद्धत स्वीकारली.

यावेळी राज्य सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. आंदोलनानंतर शेतकऱ्यांनी आपल्या मागण्यांचे निवेदन प्रशासनाला सादर केले.

### महायुतीचं आश्वासन ...

केली, असा आरोप आंदोलक शेतकऱ्यांकडून करण्यात आला.

महामार्गावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या असून वाहतुकीवर मोठा परिणाम झाला. आंदोलनामुळे नागरिक व वाहनचालकांना त्रास सहन करावा लागला.

यावेळी शेतकरी संघटनांचे कार्यकर्ते, पदाधिकारी तसेच प्रहार जनशक्ती पक्षाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आंदोलनानंतर शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांचे निवेदन तलाठी यांच्याकडे देण्यात आले.

**प्रमुख मागण्या:** संपूर्ण व सरसकट शेतकरी कर्जमाफी त्वरित लागू करावी, महायुती सरकारने दिलेलं आश्वासन पाळावं, शेतकऱ्यांना हमीभाव व पिकविमा भरपाई तत्काळ मिळावी.

घटनास्थळी शेतकरी संघर्ष कृती समितीचे पदाधिकारी, प्रहार जनशक्ती पक्षाचे कार्यकर्ते, शेतकरी संघटनेचे प्रतिनिधी व शेकडो शेतकरी उपस्थित होते.

### शिबीरात वकील ...

मार्गदर्शनाखाली रोटरी रेनबो क्लबच्या सहकार्याने १ जुलै या डॉक्टर डे पासून सुरू करण्यात आलेल्या या अभियानात १० हजार थायरॉईड मोफत करण्यात येणार आहेत. ही अभियान ३० जून २०२६ पर्यंत चालणार आहे. ठिकठिकाणी शिबिराचे आयोजन केले जात आहे.

या अभियानासाठी रोटरी क्लब ऑफ जालना रेनबोच्या अध्यक्ष डॉ. प्रतिभा श्रीपत, सचिव पंकज लड्डा, इंद्रायणी पॅथॉलॉजीचे डॉ. जितेंद्र बारगाजे, डॉ. संदीप कुलकर्णी यांचे सहकार्य लाभत आहे, अशी माहिती प्रकल्प प्रमुख डॉ. राजेश सेठीया यांनी दिली.

### निकृष्ट दर्जाचे ...

त्यांच्या खाद्य पदार्था मार्फत होऊ नये याची दक्षता घ्यावी. निकृष्ट दर्जाचे खाद्य पदार्थ विक्री आणि पुरवठा करणार्यावर योग्य ती कारवाई करावी अशी मागणी श्री. कुलकर्णी सहायक आयुक्त अन्न व औषध प्रशासन यांना निवेदना द्वारे करण्यात आली आहे.

## वाचकांचे मनोगत

### लोकल प्रवाशांचे सर्वेक्षण करून उपयोग शोधा !

लोकल मधील गर्दी कमी कशी करायची हे रेल्वे प्रशासना पुढील मोठे आव्हान आहे.ब्रिटिशांनी शंभर- सव्वाशे वर्षापूर्वी सुरू केलेली वाहतूक व्यवस्था आजमितीस त्यांच्याच व्यवस्थेवर सुरू आहे.मध्य रेल्वे कसारा मार्ग व कर्जत मार्ग १२० - १०० किलोमीटर दूर आहेत.पश्चिम रेल्वे विरार आणि हार्बर पनवेल पर्यंत विस्तारले आहेत. मध्य रेल्वेमार्गाला पर्यायी मार्ग असायला हवा.पावसाळ्यातील रेल्वेमार्गावर प्रवास जीवावर बेततो.भायखळा रेल्वे स्टेशन पासून मुलुंड पर्यत सखल भाग असल्याने रेल्वेमार्गावर तीन फुट पाणी भरते.वाहतूक सेवा ठप्प होते.म्हणून या मार्गावरील सर्व स्टेशन जमिनीपासून उंचीवर हवीत.सद्य स्थितीत हे शक्य दिसत नाही.म्हणून नवीन मार्ग तयार केला तर भविष्यातील अडचणी कमी होतील.गर्दीची ठिकाणे परेल,दादर,कुर्ला,घाटकोपर, भांडुप, मुलुंड, ठाणे,दिवा, डोंबिवली,कल्याण, अंबरनाथ, बदलापूर, कर्जत, टिटवाळा,आसनगाव,कसारा.पश्चिम- चर्नीरोड,ग्रॅटरोड, मुंबई सेंट्रल, दादर,बांद्रा,सांताक्रूझ, विलेपार्ले,अंधेरी,जोगेश्वरी ,गोरेगाव, मालाड,बोरिवली,मीरा रोड, भाईंदर ,वसई नालासोपारा,विरार- हार्बर- डॉकयार्ड, रे रोड, शिवडी ,गुरू तेगबहादूर नगर,कुर्ला,चेंबूर, गोवंडी,मानखुर्द, वाशी, बेलापूर, पनवेल. या विभागांची लोकसंख्या विचारात घेणे आवश्यक आहे.मुंबईतील मुंबई महानगरपालिकेच्या पंचवीस प्रभागातील प्रत्येक प्रभागाची लोकसंख्या किमान आठ ते नऊ लाखाच्या आसपास आहे.तसेच इतर शहरातील विभागांची संख्या त्यांच्या नगर रचनेनुसार आहे.मुंबई, ठाणे,रायगड ,पालघर जिल्ह्यातील रेल्वेमार्गावरील प्रवाशांची ने - आण करते. किमान सत्तर लाख प्रवासी दररोज प्रवास करतात. शिवाय मेल- एक्स्प्रेस गाड्यांतून येणारे प्रवाशी वेगळे.मुंबईतील लोक मुंबई बाहेर स्थलांतरित झाले.कल्याण- डोंबिवलीतून छत्रपती शिवाजीमहाराज टर्मिनस कडे येणारा प्रवासी आपल्या कार्यालयाच्या वेळेच्या आधी दोन तास घर सोडतो. लोकल वेळेवर असेल तर कार्यालयात वेळेवर पोहचतो.हीच परिस्थिती घरी जाताना असते.महिलांची तारेवरची कसरत असते,चूल,मूल सांभाळून कार्यालयात वेळेवर पोहचायचे असते.बेबीसिटर मध्ये मुलाला सोडून नंतर रेल्वे स्टेशन गाठावे लागते.रेल्वे प्रशासनाने ८०० आस्थापनांना कार्यालयीन वेळा बदलण्याची सूचना केली तरी भौगोलिक परीस्थिती कशी हाताळणार. प्रवासी आपला नेहमीचा डबा धरण्यासाठी तीन ते चार डबे पुढे येऊन धावत्या गाडीत चढतो कशासाठी तर आसन मिळावे म्हणून एवढा हा जीवघेणा प्रवास आहे. वृद्ध, आजारी रुग्ण, वेगवेगळे आजार असलेल्या प्रवाशांचे डोळे गर्दी पाहून पांढरे होतात. कार्यालयीन वेळा बदलून प्रवाशांची हेळसांड होणार.धिम्या आणि तेज गाड्यांच्या प्रवासात पाच सात मिनिटांचा फरक पडतो.मध्य रेल्वेमार्गावर मेल - एक्स्प्रेस गाड्याही धावतात त्यांच्या वेळाही तेवढ्याच महत्वाच्या आहेत. चाळीस गाड्या जातात तशा तेवढ्याच गाड्या परत येतात. हीच परिस्थिती पश्चिम रेल्वेमार्गावरील आहे.मेल - एक्स्प्रेस गाड्या बोरिवली - ठाण्यापर्यंत आणून पुढे लोकल प्रवास केला तर बर्यापकी फरक पडेल. बोरिवली - ठाण्यापर्यंत लोकल प्रवास सुरळीत होईल. पुढील पन्नास वर्षे प्रवास चांगला होईल अशी उपाययोजना रेल्वे प्रशासनाने करावी.

**महादेव गोळवसकर**
**कुर्ला मुंबई, ९८६९४७६२०९**
mahadeogolvaskargmail.com

# माणिकराव कोकाटें बद्दल सरकार एवढी लाचार का?

सध्याच्या परिस्थितीत राज्यातील काही आमदार,मंत्री व राजकीय कार्यकर्त्यांनी कायद्यांचे उल्लंघन करून संपूर्ण हद्दी पार केल्याचे स्पष्ट दिसून येते यावर मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी सुध्दा चिंता व्यक्त करीत म्हणाले होते की अशा घटना वारंवार होत रहाल्या तर लोक म्हणतील की संपूर्ण आमदार माजले असे सुचक विधान त्यांनी विधानभवन परिसरात झालेल्या हाणामारीच्या दरम्यान केले होते.या अगोदर संजय गायकवाड यांनी आमदारकीची हद्दपार करून विधानभवन कॅन्टीन मालकाला पावेल आणि बनीयानवर येवून मारहाण केली व विधानभवनाच्या सभ्यतेचे उल्लंघन केले आणि आतातर कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी संपूर्ण हद्दपार करून शेतकऱ्यांच्या समस्येकडे पाठ फिरवून रम्मी खेळण्यात व्यस्त आहेत. कोकाटे नेहमीच वादाच्या भोवऱ्यात रहाले आहेत,तरी सरकार व पक्ष त्यांच्या पाठीशी उभे आहेत हे कसे काय?ही बाब राज्याच्या १४ कोटी जनतेच्या समजण्या पलिकडील आहे. राज्यात निसर्ग आपली करवट बदलत आहे कधी खूप पाऊस तर कधी पाऊसाची दडी यामुळे शेतकरी मोठा चिंतेत आहेत आणि मंत्री कोकाटे महाशय रम्मी खेळण्यात गुंग आहेत. वारे वा,शेती प्रधान देशा तुझ्या छायेत असेही नालायक आणि बेशरम मंत्री असतात ही दु:खाची बाब आहे. राज्यातील शेतकरी दररोज कुठे ना कुठे आत्महत्या करीत आहे, शेतकऱ्यांजवळ शेती वाहण्यासाठी बैल नाही हे सुद्धा महाराष्ट्रासह संपूर्ण देशानी पाहीले, शेतकरी जमीनीने व मनाने करोडपती असुन सुद्धा पैशांनी शुन्य आहे, शेतकऱ्यांच्या मुलांसाठी शाळेत जाण्यासाठी पुलाची व्यवस्था नाही भर पावसात झाडांच्या फांद्यांवरून चढून शाळेत जावे लागते अशा अनेक जटील समस्या राज्यापुढे आहेत,शेतकऱ्यांच्या मुलभूत व अती आवश्यक सेवांकडे दुर्लक्ष करून रम्मी खेळने म्हणजेच जुगार खेळण्यात राज्याचा कृषी मंत्री कोकाटे व्यस्त असतो,ते ही विधानपरिषदेत चर्चे दरम्यान याला किती शरमेची आणि लाजीरवाणी गोष्ट म्हणावी आणि अशा घृणास्पद कृत्याबद्दल अजून पर्यंत त्यांचा राजीनामा सुध्दा सरकारने मागीतला नाही किंवा कठोर कारवाई सुध्दा केली नाही म्हणजेच सरकारला अश्याच लोकांची गरज आहे का असाही प्रश्न उपस्थित होतो. पुर्वी देशाचे राजकारण महाराष्ट्रातुन चालायचे परंतु आता तर महाराष्ट्राला राजकीय पुढाऱ्यांनी संपूर्णपणे कलंकित केले आहे.पुर्वी युपी-बिहारीमध्ये गुंडाराज चालायचा असे म्हटल्या जायचे.परंतु आता तर महाराष्ट्रात गुंडाराज विधानभवन परिसरात दिसून येत आहे आणि जबाबदार कोकाटे सारखे मंत्री विधानपरिषदेत रम्मी सारखे जुगार खेळण्यात मग्न आहेत.यामुळे राज्याच्या जनतेला काय मॅसेज जाईल व हे मंत्री काय जनतेचे व शेतकऱ्यांचे सेवा करेल हा मोठा आणि गहण प्रश्न उपस्थित होतो.जो व्यक्ती शासनाला भिकारी म्हणतो यावरून त्यांची मानसिकता किती खालच्या दर्जाची असेल हे आपण समजू शकतो.तरीही सरकार शांत आहे हे कसे काय?या अगोदर सुध्दा शेतकऱ्यांबद्दल घृणास्पद आणि बेजबाबदार वक्तव्य केले होते. म्हणजे अनेकदा शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळुन ठेच पोहचणारे, शासनाला कमजोर करणारे आणि राज्याच्या १४ कोटी जनतेची अवहेलना करणारे अनेक वक्तव्य करणाऱ्या मानिकराव कोकाटेंना सरकार अभय का देत आहे? ही अत्यंत शरमेची व लाजिरवाणा बाब आहे असे मी समजतो.राज्याची जनता, शेतकरी व प्रशासन यांच्या विरुद्ध वारंवार अवहेलना करणारे वक्तव्य करणाऱ्या कोकाटेंना मंत्री पदावरून व आमदारकी पदावरून ताबडतोब बरखास्त करायला पाहिजे होते. आपण म्हणतो की गुन्ह्याला माफी



नाही,परंतु शेतकऱ्यांचा, राज्याच्या जनतेचा व सरकारचा मोठा अपमान करणारा गुन्हेगार कोकाटे आहे हे माहीत असुन सुद्धा मंत्री पदावर विराजमान आहे.म्हणजेच सरकार व कोकाटेंचा पक्ष गुन्हेगाराला एकावर-एक माफ करतांना दिसत आहे ही लोकशाहीला कलंकित करणारी बाब आहे.आता अशी चर्चा आहे की स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा विचार करता त्यांचा मंत्रिपदाचा राजीनामा घेतला जाणार नाही.कोकाटेंकडुन कृषी खाते काढून ते मकरंद पाटील यांना दिले जाईल आणि पाटील यांच्या कडील मदत व पुनर्वसन खाते कोकाटेंना दिले जाईल अशा चर्चेला उफान आले आहे म्हणजेच विधानपरिषदेत रम्मी सारखा जुगार खेळणारा मंत्री, शेतकऱ्यांचा अपमान करणारा व १४ कोटी जनतेला ठेच पोहचणारे कोकाटे यांच्यावर कायदेशीर कोणतीच कारवाई न करता सरकार अभय देत आहे ही राज्यासाठी, शेतकऱ्यांच्या दृष्टीकोनातून धक्कादायक बाब आहे.यावर सरकार व राज्यपालांनी गांभीर्याने विचार करावा व माणिकराव कोकाटेंवर योग्य ती कायदेशीर कारवाई करावी.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९,नागपूर.**

# टेंभुर्णी येथील संत सावता महाराज यांच्या पुण्यतिथी सप्ताहाची सांगता



**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** येथील श्री संत सावता महाराज आणि संत नामदेव महाराज यांच्या पुण्य तिथी निमित्त आयोजित ४१ व्या कार्यक्रमाला पूर्ण सात दिवस असलेल्या हरी नाम किरण हरिपाठ किर्तन आणि सात दिवसाच्या विशेष अन्नदान सह शेवटच्या दिवशी प्रसिद्ध असलेल्या चवदार वरण पोळी चा मोठा भंडारा प्रसदी पार पडली.

सकाळी काल्याचे कीर्तन झाल्यानंतर निघालेल्या पालखी सोहळ्याच्या आनंद पूर्ण गावांनी घेऊन त्यात सामील होऊन टाळ मूर्दुंग वाजत गाजत सामील होऊन देवाच्या नाम स्मरण मध्ये तल्लीन होवून आनंद घेतला.

या वेळी आयोजित भंडाऱ्याला या वेळी समाजाने काही नियम अटी नक्की करून खूप जोरात कार्यक्रम पार पाडला या मध्ये तरुण मंडळी चा मोठा सहभाग असल्याने त्यांनी दिलेल्या नियमाचे पालन करून हा सगळा कार्यक्रम चांगला पार पाडला. महिलांनी या सगळ्या कार्यक्रमासाठी आप आपल्या घरून ताज्या पोळ्या करून देऊन मोठा हिस्सा घेत या कार्याला मोठा हातभार लावला. सर्व तरुण मंडळी यांनी सहभाग घेत हा सगळा कार्यक्रम शांततेत पार पडला.

# शेतकऱ्यांना नुकसान भरपाई न दिल्यास शिवसेना स्टाईल आंदोलन - प्रदीप बोराडे

**मंठा । प्रतिनिधी -** मंठा तालुक्यात २१ जुलै ते २३ जुलै दरम्यान झालेल्या अतिवृष्टीने हजारो हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. नुकसानग्रस्तांच्या शेतीचे तात्काळ पंचनामे करून त्यांना आर्थिक मदत करावी अन्यथा तहसील कार्यालयावर बैलगाडीसह मोर्चा काढून शिवसेना स्टाईल आंदोलन करणार असा इशारा शिवसेना तालुकाप्रमुख प्रदीप बोराडे यांनी दिला आहे.

यासंदर्भात तहसीलदार मंठा यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, मंठा तालुक्यातील बहुतांश गावात ज्यामध्ये जयपूर, बेलोरा, बेलोरा तांडा, एरंडेश्वर, कोकरसा, दहा, शिवनगिरी , माळेगावसह अनेक गावात मोठ्या प्रमाणात ढगफुटीसदृश्य पाऊस होवून शेतकऱ्यांच्या शेतातील पिके मातीसह वाहून गेली. काही ठिकाणाच्या जमीनी देखील खरडून गेल्या आहेत. यामध्ये सोयाबीन, कापूस, तुर, उडिद, मुग या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. नुकसानग्रस्त शेतीचे तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना तात्काळ मदत मिळवून देण्यात यावी नसता शिवसेना स्टाईलने बैलगाडीसह तहसील कार्यालयावर मोर्चा काढण्यात येईल याची नोंद घ्यावी. असा इशारा निवेदनात देण्यात आला आहे. यावेळी शिवसेना



तालुकाप्रमुख प्रदीप बोराडे, अनंता वैद्य, उपतालुकाप्रमुख देविदास खरात, आसाराम बोराडे, बाळासाहेब वैद्य, सचिन चव्हाण, करण बोराडे, निलेश बोराडे, विठ्ठल देशमुख, राम देशमुख, लक्ष्मण देशमुख, अर्जुन मस्के, अभिमान मस्के, गणेश बनसोडे, रमेश बनसोडे, रामेश्वर देशमुख, मधुकर राठोड,विनोद पवार, रामप्रसाद पवार, गजानन देशमुख, हनुमंत देशमुख, बाजीराव देशमुख, मारोती देशमुख, उद्धव देशमुख, गजानन काकडे, विजय बनसोडे, गोविंद पवार, परसराम देशमुख यांची उपस्थिती होती.

# राजमाता जिजाऊ इंग्लिश स्कूल टेंभुर्णी येथे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची जयंती उत्साहात साजरी



**टेंभूर्णी । प्रतिनिधी -** राजमाता जिजाऊ इंग्लिश स्कूल टेंभुर्णी, येथे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची जयंती साजरी करण्यात आली कार्यक्रमाच्या सुरुवातीला लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या प्रतिमेची पूजन करून दीपप्रज्वलन करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी जिजामाता ग्रामीण विकास मित्र मंडळाचे अध्यक्ष मा. संजयजी लहाने सर यांची उपस्थिती होती पालक प्रतिनिधी म्हणून गजानन जायभाये, दिनकर नागरे, रामू उखर्डे, संदीप परसने, महादू धारे, शरद म्हस्के ,कृष्णा सोसाळे, गणेश मुनीमाणिक, माधुरी मुनीमाणिक
यांची उपस्थिती होती.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन पर बोलताना संजयजी लहाने म्हणाले की,

बाळ गंगाधर टिळक हे एक थोर भारतीय स्वातंत्र्य सैनिक समाज सुधारक ,पत्रकार आणि वकील होते ,स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच. ही त्यांची प्रसिद्ध घोषणा आहे जी त्यांनी भारतीय स्वातंत्र्य लढ्यात लोकांना प्रेरणा देण्यासाठी दिली होती त्यांच्या कार्यामुळे ते लोकमान्य म्हणून ओळखले जातात.

तसेच विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमांमध्ये भाषणे केली यामध्ये ब्ल्यू हाऊस विद्यार्थी, रणवीर मस्के ,वैष्णवी बोऱ्हाडे मनस्वी उगले **भूमिका धनवई,**

ग्रीन हाऊस विद्यार्थी, आराध्या उभरहांडे ,ऋतुजा मोरे, युवराज जोशी ,आनंद जाधव, स्वराज फलके, यलो हाऊस विद्यार्थी

तनुश उगले, संस्कृती उगले ,पार्थ जाधव.

रेड हाऊस विद्यार्थी

आरोही जाधव, मनस्वी नवले, आदित्य म्हस्के ,श्रुती चव्हाण विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

सूत्रसंचालन. वनिता सुद्रिक यांनी केले.

या कार्यक्रमासाठी शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी प्राचार्य गजानन वायाळ, मुख्याध्यापक संजय फलटणकर अमोल तेलंग्रे, विनोद उबरहंडे, विनोद धवलिया , भागवत लहाने,शरद राजभोज, विशाल शिंगणे, वनिता बोडखे ,रोहिणी सोळुंके ,सविता बकाल, स्नेहल रिंढे ,सुनिता गायकवाड, अश्विनी दुन गहू ,वैशाली सोनूने, शंकर सावडे, विमल मदन उपस्थित होते.

# जिल्हा परिषद शिक्षक पतसंस्थेच्या मानद सचिवपदी संजय लोखंडे यांची निवड

**जाफराबाद । प्रतिनिधी -** जिल्हा परिषद शिक्षक पतसंस्था जाफराबादच्या मानद सचिव पदी संजय लोखंडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. पतसंस्थेच्या स्वीकृत संचालक पदी बद्रीनाथ जायभाये,प्रहार शिक्षक संघटनेचे तालुकाध्यक्ष कैलास बकाल, तज्ञ संचालक म्हणून शिक्षक भारतीचे निंबाजी कड, मानद संचालक म्हणून अनिल भोसले यांचीही बिनविरोध निवड करण्यात आली. पतसंस्थेचे चेअरमन गणेश पवार यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी तारीख २१ पतसंस्थेच्या सभागृहात आयोजित विशेष बैठकीत सदर निवडी



करण्यात आल्या.यावेळी विनोद कळंबे,वसंता शेवाळे, दिपक चव्हाण, प्रदिप ताठे, छाया पुंगळे यांच्यासह प्राथमिक शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष भगवान भालके,दिनकर भोसले,तालुकाध्यक्ष प्रदीप साळोख, रिजवान शेख,बळीराम उबरहांडे, अनंता जंजाळ, विजय वैद्य,पंकज पाटील, नारायण मेरत, कृष्णा दिवटे, अनंता लोखंडे गजानन लोखंडे अमोल तोंडे, संदीप सोळंके, श्रीराम देठे प्रवीण अंभोरे उपस्थित होते.

# शिवकालीन रणरागिनी या विषयावर निबंध लेखन स्पर्धा

**मुंबई । प्रतिनिधी -** छत्रपती शिवाजी महाराजांच्या कालखंडात अनेक तेजस्विनी स्त्रियांनी समाज, कुटुंब, युद्धनीती, राज्यकारभार आणि संस्कृतीमध्ये अतुलनीय योगदान दिले. या स्त्रीशक्तीचा अभ्यास, जागर आणि अभिमान व्यक्त व्हावा, यासाठी श्री शिवाजी ज्ञानपीठ (इंटरनॅशनल) संस्था आणि मराठी साहित्य व कला सेवा यांच्या संयुक्त विद्यमाने एक राज्यस्तरीय निबंध लेखन स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. स्पर्धेचा विषय शिवकालीन रणरागिनी असा असून निबंध पाठवण्याची अंतिम तारीख २५ ऑगस्ट २०२५ आहे. संपूर्ण महाराष्ट्रातील विद्यार्थी, अभ्यासक, गृहिणी, लेखक आणि साहित्यप्रेमींना या स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन करण्यात येत आहे. १००० ते १५०० शब्दमर्यादा असून, स्पर्धा खुल्या गटात होणार आहे. विजेत्यांना प्रथम क्रमांकासाठी रोख रक्कम रुपये ५,000/-, द्वितीय क्रमांकासाठी ३,000/- आणि तृतीय क्रमांकासाठी २,000/-, सन्मानचिन्ह आणि सर्व सहभागींना प्रमाणपत्र मुंबई येथे १५ सप्टेंबर २०२५ रोजी होणाऱ्या कार्यक्रमात देण्यात येईल. स्पर्धेची नियमावली आणि अधिक माहितीसाठी marathisahityavkalasevagmail.com किंवा Whatspp क्रमांक ९९८७७४६७७६ यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात येत आहे.

# जालना जिल्ह्यात कुरेशी समाजावर होणारे हल्ले थांबवा

## जिल्हाधिकाऱ्यांकडे ऑल इंडिया जमीयतुल कुरेशी संघटनेचे निवेदन



**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यातील कुरेशी समाजावर गौरक्षकांच्या नावाखाली समाज कंटकांकडून होणाऱ्या हल्ल्यांमध्ये वाढ होत असल्याचा आरोप करत, या हल्ल्यांना आणि बेकायदेशीर कारवाईला तात्काळ आळा घालावा, अशी मागणी ऑल इंडिया जमीयतुल कुरेशी संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर, गुरुवार, (दिनांक २४) रोजी दुपारी ३ वाजेच्या सुमारास कुरेशी समाजाच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी जालना यांची भेट घेऊन निवेदन दिले. निवेदनात म्हटले आहे की, बजरंग दल, विश्व हिंदू परिषद, इत्यादी काही कट्टरपंथी संघटनांकडून गौरक्षकांच्या नावाखाली कुरेशी समाजावर अन्याय केला जात आहे. यात समाजबांधवांवर खोट्या गुन्ह्यांची नोंद, तडीपार, एमपीडीए, मकोका यासारख्या गंभीर कायद्यांतर्गत अटक व छळ होत आहे. काही ठिकाणी पोलिसांमार्फत जबरदस्तीने जनावरे जप्त करण्यात येत आहेत. या साऱ्या कृतींना त्वरित थांबवण्याची मागणी करण्यात आली. निवेदनाद्वारे केलेल्या मागण्यांमध्ये गौरक्षकांच्या नावाखाली होणारी बेकायदेशीर कारवाई थांबवावी, सरकारने लावलेले खोटे फौजदारी गुन्हे मागे घ्यावेत, गौरक्षा कायदा (२०१५ चा दुरुस्ती कायदा) रद्द करावा, स्लॉटर हाऊसची निर्मिती सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार तातडीने करावी, गौशाळांमध्ये पोलिसांनी बळजबरीने जप्त केलेल्या जनावरांची चौकशी करून ती मूळ मालकांना परत द्यावीत, अनुपयोगी व भाकड जनावरांबाबत न्यायालयीन मार्गदर्शनानुसार स्पष्ट निर्णय घ्यावा, पशु व्यापारासाठी शासनमान्य वाहतूक परवाने देण्यात यावेत, या मागण्यांचा समावेश आहे.

कुरेशी समाजावर अन्याय करणाऱ्या घटकांवर जर त्वरित कारवाई झाली नाही, तर समाज आंदोलनात्मक पवित्रा घेईल, असा इशाराही देण्यात आला आहे. शेतकरी, पशु व्यापारी, सामान्य मुस्लिम समाज यांच्यावर होणारे अन्याय थांबवणे ही प्रशासनाची जबाबदारी असल्याचे त्यांनी स्पष्टपणे मांडले.

कुरेशी समाजाच्या वतीने सुप्रीम कोर्ट व मुंबई उच्च न्यायालयातील निर्णयांचा दाखला देत शासनाने स्लॉटर हाऊस, जनावरांची जप्ती, वाहतूक व व्यापार याविषयी न्यायनिष्ठ निर्णय घ्यावेत, अशी भूमिका मांडली गेली. विशेषतः, PEL 21/2024 नुसार भाकड व अनुपयोगी जनावरांसंदर्भात तत्काळ निर्णय घ्यावा, अशी त्यांची मागणी होती.

या निवेदनप्रसंगी ऑल इंडिया जमीयतुल कुरेश संघटनेचे जिल्हाध्यक्ष असलम महेमूद कुरेशी, उपाध्यक्ष गफार कुरेशी, तसेच खालिद कुरेशी, अब्दुल मजीद कुरेशी, रईस कुरेशी, शाहनवाज खालिद कुरेशी, साजिद कुरेशी, सरफराज कुरेशी, कादर कुरेशी, मुजम्मिल कुरेशी, जावेद कुरेशी, अ. बासेत कुरेशी, अहमद नुर सर यांच्यासह कुरेशी समाजाचे अनेक सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चंदनझीरा येथे संत सावता महाराज किर्तन सोहळ्यास आ. खोतकर यांनी लावली हजेरी

**जालना । प्रतिनिधी -** चंदनझिरा येथे श्री संत शिरोमणी सावता महाराज यांच्या संजीवन समाधी सोहळा निमित्त भव्य कीर्तन सोहळा आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी अंदाज समिती प्रमुख तथा आमदार अर्जुनराव खोतकर यांनी उपस्थित राहुन श्री संत शिरोमणी सावता महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन केले.
या वेळी उपस्थितांशी संवाद साधताना संत शिरोमणी सावता माळी यांचे अभंग म्हणत त्यांच्या अभंगांमध्ये भक्ति, कर्म आणि सेवेचा महिमा असल्याचे खोतकर म्हणाले.
या वेळी कीर्तनकार ह.भ.प माऊली पिंगळकर महाराज यांचे अत्यंत सुंदर भक्तीमय कीर्तन ऐकण्याचा योग आला.
या प्रसंगी उपस्थित परिसरातील भजनी मंडळी, भाविक भक्त आणि ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.




# सामान्य कार्यकर्ता हीच राष्ट्रवादी काँग्रेसची ताकद - चंद्रकांत दानवे

## जि.प., पं.स. निवडणुकीच्या अनुषंगाने बैठक

**विशाल देशमुख**

**जाफराबाद -** जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीत कार्यकर्त्यांनो आतापासून तयारीला लागा. वेळ कमी आहे, गावपातळीवर गटानिहाय तयारी करून, नवीन गट रचनेची माहिती घेऊन, पक्ष जो उमेदवार देईल, त्या उमेदवाराच्या पाठीशी ठाम उभे रहा, पक्षाने ज्यांना मोठ केलं ते ऐनवेळी सोडून गेले. पण पुन्हा आपण नव्याने सगळ उभे करू, पक्ष संघटना वाढवू, सामान्य जनतेशी चर्चा करून उमेदवार ठरवू, सामान्य लोकांना, नवीन लोकांना संधी देऊ. इच्छुकांनीदेखील सामान्य जनतेची मते विचारत घेऊन चर्चा करावी. होऊ घातलेल्या निवडणुकीच्या अनुषंगाने कार्यकर्त्यांनी आजपासून उमेदवार म्हणून तयारीला लागा, असे आवाहन माजी आमदार चंद्रकांत दानवे यांनी केले.

जाफराबाद येथील कोहिनूर मंगल कार्यालयात २२ जुलै रोजी कार्यकर्ता आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी ते बोलत होते. व्यासपीठावर अंबादास रगडे, सुधाकर दानवे, तालुकाध्यक्ष रामधन कळंबे, नगराध्यक्षा डॉ. सुरेखा लहाने, एकनाथ शेवत्रे, साबेद चाऊस, नितीन शिवणकर, गुड्डू मघाडे, रघुनाथ पंडित, गजानन लोखंडे, शेख मुजीब, शेख सउद, फहीम खाँ पठाण, राजू जाधव, अ‍ॅड. रामकृष्ण बनकर, वामन दांडगे, अमोल शेळके आदी उपस्थित होते.




जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीच्या अनुषंगाने अनेक कार्यकर्त्यांनी मनोगत व्यक्त केले. भारतीय जनता पक्षाने सत्तेचा उपयोग करून प्रशासनाला हाताशी धरून तालुक्यात गट रचनेत मोठे हस्तक्षेप केल्याचा आरोप अनेकांनी मनोगतातून केला. जाफराबाद तालुक्यातील सामान्य कार्यकर्त्या आजपर्यंत कोणत्याही आमिषाला बळी पडलेला नाही. त्यामुळे भारतीय जनता पक्ष रडीचा डाव खेळत आहे. सामान्य कार्यकर्ता हिच राष्ट्रवादी काँग्रेसची ताकद आहे.

भाजपच्या पायाखालची वाळू घसरलेली आहे. प्रत्येक कार्यकर्त्याने गावाची जबाबदारी घेऊन पूर्ण ताकदीने काम करा, असेही चंद्रकांत दानवे यांनी यावेळी सांगितले.

यावेळी एल. बी. शिंदे, बाबासाहेब जाधव, गणेश बापू चव्हाण, विनोद खेडेकर, शेख शफी, विठ्ठल गोरे, गजानन जाधव, के.एम. पंडित, प्रकाश राऊत, रमेश राठोड, उत्तम उगले, भगवान बनकर, प्रल्हाद लोखंडे, भगवान गिरनारे, भाऊसाहेब गाढे, परसराम ढाले, कौतिकराव राऊत, दादाराव सरोदे, सचिन अवकाळे, योगेश सवडे, संतोष अंभोरे, शेख आसिफ, प्रकाश शेळके यांच्यासह तालुक्यातील राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे कार्यकर्ते, पदाधिकारी उपस्थित होते.

# सुरज चव्हाण यांचे बॅनर तातडीने काढा, अन्यथा फाडून टाकू

## शेतकरी संघर्ष कृती समितीचा इशारा



**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील छत्रपती संभाजीनगर चौफुली परिसरात लावलेले सुरज चव्हाण यांचे बॅनर तातडीने हटवावेत, अन्यथा ते फाडून टाकण्यात येतील, असा इशारा शेतकरी संघर्ष कृती समितीच्या वतीने राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) ला देण्यात आला आहे.

आज दिनांक २४ जुलै रोजी दुपारी चार वाजता मिळालेल्या माहितीनुसार, लातूर येथे काही दिवसांपूर्वी छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विजयकुमार घाडगे यांना सुरज चव्हाण यांनी मारहाण केली होती. या घटनेचा तीव्र निषेध नोंदविण्यात येत असून, त्याचे पडसाद जालना शहरातही उमटले आहेत.

या पार्श्वभूमीवर जालन्यात छत्रपती संभाजी नगर चौफुली परिसरात राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) च्या बॅनरवर सुरज चव्हाण यांचा फोटो लावण्यात आल्याने संतप्त प्रतिक्रिया उमटल्या आहेत. शेतकरी संघर्ष कृती समितीने संबंधित बॅनर २४ तासांच्या आत हटवण्याची मागणी केली असून, अन्यथा थेट बॅनर फाडण्यात येईल, असा इशारा दिला आहे.

या आंदोलनात गजानन देठे, कारभारी मसले यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते. आंदोलकांनी सांगितले की, गुन्हेगाराला महत्त्व देणारे पोस्टर शहरात लावणे ही जनतेच्या भावना दुखावणारी गोष्ट आहे.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.